**जनसंपर्क अधिकारी**
**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट-२९४/२०२२** **दिनांक : ०३/१०/२०२२**

# बतावणी करुन पैशांची बॅग चोरी करणाऱ्या सराईत आरोपीतांना गजाआड करण्यात पेल्हार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २३/०९/२०२२ रोजी दुपारी ०३.०५ वा. चे सुमारास तक्रारदार हे त्यांचे एव्हरशाईन सिटी, वसई (पु.), येथील एच.डी.एफ.सी. बँकेतुन पैसे काढुन घेवुन जात असतांना अनोळखी आरोपीतांनी त्यांचा पाठलाग करत तक्रारदार हे त्यांचे ॲक्टीव्हा मोटर सायकलवरुन वसई फाटा ब्रिजचे उतरणी जवळील सुलभ शौचालयाच्या जवळ येथे आले असता त्यांना एका मोटार सायकल वरील अनोळखी इसमाने तुमचे पैसे पडले आहे असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांची ॲक्टीव्हा रोडचे कडेला उभी करुन पडलेले पैसे उचलण्यासाठी गेले असता दुसऱ्या मोटार सायकलवरील अनोळखी इसमांनी फिर्यादी यांचे ॲक्टीव्हा मोटर सायकलचे डिक्कीतील रोख रक्कम ३,००,०००/- रुपये चोरी करुन घेवुन गेले होते. सदरबाबत फिर्यादी- श्री. बिपीन ईश्वरलाल पांचाळ, वय- ४८ वर्षे, धंदा- फॅब्रीकेशन, रा. चितळसर, मानपाडा, घोडबंदर रोड, ता. जि. ठाणे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीतांवर पेल्हार पो. स्टे. गु. रजि. नं. I ८१३/२०२२ भा.दं.वि.सं. कलम-३७९ प्रमाणे दिनांक २३/०९/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवुन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे व मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवुन घटना तांत्रीक पुरावे हस्तगत केले. मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने आरोपीतांचा शोध घेवून आरोपीत नामे. १) कुनचला चिन्ना बाबु, २) किशोर गुड्डेट्टी व्यंगटया, दोन्ही रा. थिप्पा कॉलणी, पोस्ट दामावरम, बोगोले, ता. कवेरी, पोलीस ठाणा- कपराला टिप्पा जि. नेल्लोरे, राज्य-आंध्रप्रदेश यांना दि.२८/०९/२०२२ रोजी ताब्यात घेवुन नमुद गुन्हयात अटक केली आहे. नमुद आरोपीतांचे चौकशी दरम्यान आरोपीत- कुनचला चिन्ना बाबु याचे विरुध्द महाराष्ट्र राज्यात पुणे, अहमदनगर, भिवंडी, ठाणे, तसेच आंध्रप्रदेश व इतर राज्यातील विविध पोलीस ठाण्यात २१ गुन्हे दाखल असुन आरोपीत गुन्हा करण्याकरीता आगोदर मोटार सायकलची चोरी करुन गुन्हा करत असतात. सदर आरोपीत यांचेकडून- गुन्हयातील रोख रक्कम-८४,५००/- रुपये तसेच चोरी करण्या करीता वापरलेल्या दोन युनिकॉन मोटर सायकल असा एकुण- २,८५,२८०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/तानाजी चव्हाण हे करत आहेत. नमुद आरोपीत यांचेकडून खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहे.

| अ.क्रं. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नंबर, कायदा व कलम |
|---|---|---|
| १ | पेल्हार | गु.रजि.नं. I ८१३/२०२२,भा.दं.वि.सं.कलम-३७९,४२०,३४ प्रमाणे (मुळ गुन्हा) |
| २ | आचोळे | गु.रजि.नं. I ३५६/२०२२, भा.दं.वि.सं.कलम- ३७९ प्रमाणे, |
| ३ | नारपोली, ठाणे शहर | गु.रजि.नं. I ५५१/२०२२, भा.दं.वि.सं.कलम- ३७९ प्रमाणे |
| ४ | भोसरी, पुणे शहर | गु.रजि.नं. I १३६/२०२२, भा.दं.वि.सं.कलम- ३७९ प्रमाणे |

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, श्री.रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउपनि/सनिल पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, पोना/प्रताप पाचुंदे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

